सर्वसिध्दांत एज्युकेशन सोसायटी, अभ्यंकर नगर, नागपूर संचलित एस.एस.इंटरनॅशनल स्कूल, गोटाड पांजरी, बेसा रोड, जि.नागपूर या शाळेचे, माधव गंधे फाऊंडेशन, रामदासपेठ, नागपूर या संस्थेस हस्तांतरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशाह ३११९/प्र.क्र.३५५/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :- शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२.

संदर्भ:- विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे क्रमांक: माध्य/अ/७८२८/२०१९, दिनांक २८ ऑगष्ट, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

सर्वसिध्दांत एज्युकेशन सोसायटी, अभ्यंकर नगर, नागपूर संचलित एस.एस.इंटरनॅशनल स्कूल (CBSE Board), गोटाड पांजरी, बेसा रोड, जि.नागपूर या इंग्रजी माध्यमाच्या स्वयंअर्थसहायित शाळेचे, माधव गंधे फाऊंडेशन, रामदासपेठ, नागपूर या संस्थेस हस्तांतरण करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सदर शाळा विषयाधीन संस्थेस हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

१) सदर शाळेचे हस्तांतरण करुन घेण्याबाबत माधव गंधे फाऊंडेशन, नागपूर या संस्थेने ठराव पारित केल्याची खात्री करावी. तसेच, सदर शाळा स्वयंअर्थसहायित शाळा असल्याने, शाळेच्या जमिनीबाबत माधव गंधे फाऊंडेशन, नागपूर या संस्थेने किमान ३० वर्षांसाठीचा नोंदणीकृत करार सादर करणे आवश्यक राहील.

२) सदर शाळा स्वयंअर्थसहाय्यित शाळा असल्याने, शाळेचे संपूर्ण आर्थिक दायित्व संस्थेवर राहील.

३) ज्या अटींवर सदर शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे, त्या सर्व अटीं शाळेचे हस्तांतरण झाल्यांनतरही संस्थेस व शाळेस लागू राहतील.

४) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची कोणत्याही कारणास्तव किमान पटसंख्येची अट शिथिल केली जाणार नाही.

५) सदर शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, हस्तांतरणानंतर त्याच तत्वावर कार्यरत राहील.

६) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.

७) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक: माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपद्धतीनुसार अंमलात येईल.

८) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदल संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेद्वारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र.(१) ची पूर्तता झाल्यावर विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सर्व बाबी तपासून आणि आवश्यक अन्य अटींचा समावेश करुन, शाळेच्या व्यवस्थापन बदलाबाबत आवश्यक पुढील कार्यवाही ४ आठवडयांत पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१९२५००८८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.09.16 12:04:31 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, बालभारती इमारत, एन.आय.टी.गार्डनसमोर, धंतोली, नागपूर - ४४० ००२.
४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर.
५) अध्यक्ष/सचिव, सर्वसिध्दांत एज्युकेशन सोसायटी, नागपूर.
६) अध्यक्ष/सचिव, माधव गंधे फाऊंडेशन, नागपूर.
७) निवडनस्ती (एसएम-१).